**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव**
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
**Email ID:-**sp.jalgaon@mahapolice.gov.in




# -:प्रेस नोट :-

दिनांक :- २२/०५/२०२६

## " आगामी निवडणुका व सणासुदीच्या पार्श्वभूमीवर जळगाव पोलिसांची मोठी कारवाई; दोन अट्टल गुन्हेगार जळगाव जिल्ह्यातून 'तडीपार'

**आगामी सण-उत्सव, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका २०२६ च्या पार्श्वभूमीवर जळगाव शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी जळगाव पोलिसांनी गुन्हेगारांविरुद्ध कडक पाऊल उचलले आहे. शहरातील सार्वजनिक शांततेस बाधा आणणाऱ्या आणि नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या दोन अट्टल गुन्हेगारांना जळगाव जिल्ह्यातून १ वर्षासाठी हद्दपार (तडीपार) करण्यात आले आहे.**

दिनांक २१/०५/२०२६ रोजी मा. उपविभागीय दंडाधिकारी, जळगाव भाग, जळगाव यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) अन्वये हे आदेश जारी करत -

**१) राम उर्फ सोनू भगवान सारवान रा. गुरुनानक नगर, जळगाव - शनिपेठ पोलीस स्टेशन हद्द**

**गुन्हेगारी पार्श्वभूमी:-** याच्यावर घरफोडी, जबरदस्ती चोरी (दरोडा), बेकायदेशीर घातक शस्त्रे बाळगणे (आर्म्स ॲक्ट), मारामारी आणि यापूर्वीच्या तडीपारीच्या आदेशांचे उल्लंघन करून मुक्या प्राण्यांवर (श्वान) जीवघेणा अमानुष अत्याचार करणे, असे गंभीर स्वरूपाचे तब्बल १३ हून अधिक गुन्हे दाखल आहेत.

**२) विशाल मुरलीधर दाभाडे रा. रामेश्वर कॉलनी, चांगापाचा मंदिराजवळ, जळगाव - एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्द**

**गुन्हेगारी पार्श्वभूमी:-** हा आरोपी घातक शस्त्रांचा धाक दाखवून नागरिकांवर जुलूम-जबरदस्ती करणे, रात्रीच्या वेळी दुकाने व घरफोडी करणे आणि शरीराविरुद्ध गंभीर गुन्हे करत परिसरात दहशत माजवत होता. प्रतिबंधात्मक कारवाई करूनही याच्यात सुधारणा झाली नव्हती.

दोन्ही आरोपींना आदेश मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत रस्ता किंवा रेल्वे मार्गाने जळगाव जिल्ह्याच्या सरहद्दीबाहेर जाण्याचे निर्देश देण्यात आले आहेत मा. उपविभागीय दंडाधिकारी किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय त्यांना **पुढील १ वर्ष जळगाव जिल्ह्यात प्रवेश करता येणार नाही.** तडीपारीच्या काळात ते ज्या भागात राहतील, तेथील नजीकच्या पोलीस स्टेशनला त्यांनी दरमहा हजेरी लावून आपला पत्ता देणे बंधनकारक आहे.

**शहरात दहशत निर्माण करणाऱ्या, कायदा हातात घेणाऱ्या आणि सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या कोणत्याही गुन्हेगाराची गय केली जाणार नसुन, नागरिकांनी निर्भयपणे राहावे जळगाव पोलीस आपल्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर आहेत. भविष्यातही अशा समाजकंटकांवर अशीच कठोर कायदेशीर कारवाई सुरू राहील. असा संदेश मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे कडुन नागरिकांना करण्यात आलेले आहे.**

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

**************************************************************************************************